REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# अनुराधा पाटील यांच्या कवितेतील 'तो' एक मिथक

डॉ. कविता मुरुमकर



मराठी साहित्याचा अभ्यास करताना व साहित्याचे स्वरूप समजून घेताना त्यामागे असलेल्या धार्मिक, पारंपरिक आणि सांस्कृतिक संचिताचा विचार करावा लागतो कोणत्याही साहित्याच्या मुळाशी त्या त्या भाषेतील सांस्कृतिक, आर्ष परंपरा उभी असते. ही परंपरा त्या साहित्याच्या मुळाशी कधी दृश्यमान स्वरूपात उभी असते तर कधी अदृश्यपणेही असते; पण तिचे असणे हे ही तेवढेच अटळ आणि एकजिनसी ठरते. जीवित पातळीवर एखादया मुनष्य.प्राण्याचा विचार करताना त्याच्या अंतर्गत रचनेतील आणि मूलद्रव्यातील वैशिष्ट्यांचा जसा त्याच्या पूर्वजांच्या रक्ताशी, मेंदूशी, गुणसूत्रांशी, रंगरूपाशी, शारीरिक बांधणीशी संबंध असतोच असतो, त्याच स्वरूपाचा संबंध साहित्याचा आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पौराणिक पूर्वसूरींशी असतो हा संबंध फारसा दृग्गोचार होत नसला तरी त्यामागील अंतर्गत संरचना मात्र पूर्वसूरींच्या या परंपरेशी संबंधित असतेच असते.त्याशिवाय समकालीन, वर्तमानकालीन साहित्याला सत्त्वही प्राप्त होत नाही. या सत्त्वाचे स्त्रोत समजून घेताना आपल्याला आर्ष किंवा तदनुषंगिक घटकांकडे वळणे अधिक महत्त्वाचे ठरते.

साहित्यात प्रकटणाऱ्या नवतेचा विचार करताना तो परंपरेच्या मूळ रूपापासूनच करावा लागतो कुठलीही नवता ही परंपरेला सोडून किंवा तिच्याशी असलेली नाळ कापून उभी राहू शकत नाही उलट कुठलीही (साहित्यातून, कलेतून प्रकट होणारी) नवता ही प्रामुख्याने परंपरेतूनच मुळातूनच उभी राहते तिचे परंपरेशी जसे रक्तमांसाचे घट्ट नाते असते तसेच ते नाते स्वीकार-नकाराचेही असते. ही नवता परंपरेच्या मातीतून, मुळातून जन्मणारी नसेल तर ती फारशी टिकूनही राहू शकत नाही कुठलेही वाङ्मयीन मूल्य हे अधांतरी, निराधार असे उभे राहणे केवळ अशक्य ठरते. उदाहरण घ्यायचे झाल्यास मराठी आधुनिक कवितेला नवे वळण देणाऱ्या बा. सी. मर्ढेकरांचेच देता येईल. बा.सी. मर्ढेकरांनी मराठीत नवकवितेची प्रतिष्ठापना केली. त्यानुषंगाने नवी काव्यमूल्ये साहित्यमूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. जुनी मूल्ये, जुन्या काव्यगत संकल्पनांना छेद देत, त्या नाकारत नवी मूल्यव्यवस्था प्रस्थपित केली. पण असे असूनही त्यांच्या कवितेचे, लेखनाचे नाते भारतीय आर्ष संस्कृतीशी, मिथक परंपरेशी अधिक जवळचे होते. म्हणूनच त्यांच्या कवितेत कृष्ण, अश्वत्थामा, द्रौपदी, गंगा, ज्ञानेश्वर, बुध्द, तुकाराम, महात्मा गांधी इत्यादी मिथके आशयाशी अधिक एकरूप झालेली आहेत. हीच गोष्ट पाश्चात्य कवी आणि समीक्षक टी.एस. इलिएट यांच्या संदर्भात सुध्दा सांगता येईल द्वितीय महायुध्दाच्या पार्श्वभूमीवर साहित्यातून नाविन्याने आणि साहित्यविषयक परंपरा भंजनाचे जे वारे वाहू लागले होते. त्यातील एक ठळक नाव म्हणून एलिएटचे नाव घ्यावे लागते. मर्ढेकरांच्या कवितेवरील प्रभावाचा विचार करताना इलिएटचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. इलिएटने 'ए मर्डर इन कॅथेड्रल' सारखे नाटक लिहून धर्मसत्तेची मूळंच तपासून पाहण्याचा प्रयत्न या नाटकातून केला. भारतीय पातळीवरील एक आधुनिक नाटककार म्हणून आपण गिरीश कार्नाडांकडे पाहतो त्यांच्या नाटकांचासुध्दा समग्राने विचार करावयाचा झाल्यास पूर्वोक्तविधानच पुन्हा अधोरेखित करावे लागते. मिथक कथांचा, प्राक्कथांचा वेगळा अन्वय लावणारी कार्नाडांची अनेक नाटके आहेत; तेव्हा साहित्याचा, साहित्यातील वर्तमानाचा, समकालाचा विचार करताना त्याच्या मुळाशी असलेल्या आर्षतेचा, सांस्कृतिक संचिताचा विचार अटळ ठरतो

मिथकांना सर्व धर्माचे आणि अखिल मानवी संस्कृतीचे अंग असते मिथकांची निर्मिती सार्वत्रिक व सर्वकालीन असून ती मानवी मनाची एक गरज असल्याचे दिसून येते. मिथक कथा ही अबोधावस्थेतील स्वप्नांचे प्रतिरूपण करतात असे दिसून येते मिथककथेचा

कल्पनाबंध कायम असला तरी कालोघात त्या कथेत वारंवार परिवर्तन होत असल्याचे आढळून येते. त्या त्या कालखंडातील जाणिवांनुसार बदललेल्या मूल्यसंदर्भात मिथक कथा नव्या स्वरूपात अवतरत असल्याचे जाणवते. मिथक कथांच्या अशा उत्क्रमणशील वाटचालीतून मानवी संज्ञेचा इतिहासच संघटित झालेला दिसून येतो. वाङ्मयीन संहितेतील व्यक्तीनिष्ठ अनुभव आणि संस्कृती संचितातील मानवी अनुभव यांच्यातील सलगता प्रस्थापित करण्यासाठी कलावंताकडून मिथकांचा कौशल्यपूर्ण वापर केला जातो. कार्यकारणभाव, तार्किकता, रूपकात्मकता हे मिथकांचे रचना विशेष आहेत. मानवी संवेदनेत संस्कृतिपूर्व काळातील मुलभूत अनुभवाचे अवशेष विखुरलेले असतात. मिथकीय वापरातून कलावंत ते आपल्या कलाकृतीतून अविष्कृत करत असतात. मिथकांच्या रूपातून त्या काळातील समाजमनातील सांस्कृतिक, भौगोलिक विशेष व्यक्त करून त्यांचा समकालीन जीवनजाणिवांशी अन्वयार्थ जोडला जातो असे दिसून येते. मिथक ही अनेक दृष्टीकोनातून तपासता येवू शकणारी असाधारण अद्भूत सांस्कृतिक गोष्ट असते. मिथक हे भाषेच्या सूचकतेतून मूलभूत घटकांचे व संस्कृतीचे अनुमान शब्दांकित करणारे कथन असते. प्रत्येक देशाच्या मिथकांमधून त्या त्या देशाच्या संस्कृतीचे, इतिहासाचे आणि सामाजिक जडणघडणीचे दर्शन घडते. कधी प्रतीकात्मक कथन काव्यासाठी तर कधी ऐतिहासिक घटिताचे कथन करण्यासाठी तर कधी समकालीन जाणिवेचे आकलन करताना यातील कालातीतता व्यक्त करण्यासाठी मिथकांचा वापर झालेला दिसून येतो. मिथके लोकरंजन तर करतातच परंतु नैतिक मूल्यांचे संवर्धन करता करता ती लोकमानसाच्या भावविश्वाचा हळवा कोपरा बनून जातात. ही मिथके विशिष्ट समाजातील सांस्कृतिक प्रतीके असतात.

अनुराधा पाटील यांचे 'दिगंत' (1981), 'तरीही' (1985), 'दिवसेंदिवस' (1992), 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' (2005) 'कदाचित अजूनही' (2017) हे कवितसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

अनुराधा पाटील या युगसंवेदनेशी नाते जोडणारी कवयित्री आहेत. त्या मीरा, जनाबाई, विठ्ठल या संस्कृतीसंचितातील मिथकीय, कल्पनाबंधाची कलात्मक गुंफण करीत कवितेला कालातीत बनवतात. त्यांच्या कवितेत स्त्री-पुरुषांचे आदिम मिथक तरलतेने साकार होते. त्यांच्या कवितेतील 'तो'(तू) हे मिथकच आहे. या मिथकांतून नेणिवेतल्या अदिम पुरुषाचे एक समग्र रूप अनुराधा पाटील आपल्या कवितेतून शब्दबध्द करतात. स्त्रीत्वाच्या अदिम मुशीतून साकार होत असतानाच स्त्रीच्या मनात सामूहिक अचेतनाच्या स्तरावर पुरुषाची प्रतिमा साकारु लागते. अनुराधा पाटील यांच्या कवितेत सामूहिक अचेतनेच्या स्तरावरून आदिपुरुष प्रतिमा साकार होतात. ईश्वर (विठ्ठल), पिता, प्रेयकर, पती, मुलगा या पुरुषरूपांतून आदिपुरुषांचे तत्त्व प्रकटत राहते. त्यामुळे हे मिथक कवयित्रीचे उर्जाकेंद्र आहे. आपल्या आयुष्यात वेगवेगळया भूमिकेतून विखुरले गेलेले रूप हे आदिपुरुषाचे रूप आपल्या प्रतिभेच्या साह्याने त्या कवितेतून शब्दबध्द करतात. स्त्रीला पूर्णत्व देणारा, तिला जीवनोत्सक बनवणारा, तिच्या जगण्याला अर्थ देणारा, तिला सुखदुःखाच्या, आशा-निराशेच्या, आसक्ती-विरक्तीच्या हिंदोळयावर नेवून सुखावणारा व दुखावणारा अशी जेवढी पुरुषरूपे या कवितेतून जाणवतात ती सारी आदिपुरुषाच्या मिथकांतून साकार झाली आहेत.

प्रत्येक माणूस हा प्रेमासाठी आसुसलेला असतो. एकाकीपणा अथवा आंतरिक दुःखावर त्याला प्रेमाची सावली हवी असते. म्हणूनच त्याला प्रेमाचा अविरत शोध असतो. या शोधाचा स्त्रोत स्त्री-पुरुषाच्या विश्वसर्जकतेच्या मिथकांजवळ आहे. स्त्री आणि पुरुष हे विश्वाच्या सर्जकतेचे मूळ मानले गेले. प्रवेश करणे आणि सामावून घेणे हा निर्मितीचा आदिबंध स्त्री-पुरुष, पृथ्वी-पाऊस, नदी-सागर, रात्र-दिवस इत्यादी गोष्टींना लागू होतो. हे सारे मीलनाचे दोन ध्रुव आहेत. स्त्री आणि पुरुष या विषयी एक मिथक आहे. ते असे की स्त्री आणि पुरुष हे एकाच चैतन्यरूपात होते. त्यांचे दोन तुकडे झाले आणि वेगळे पडले तेव्हापासून पुरुष असलेला तुकडा त्याच्याशी संबंधित असलेल्या स्त्रीच्या शोधात असतो. तिच्याशी जुळण्यासाठी, तिच्यात एकरूप होण्यासाठी. स्त्री असलेल्या तुकड्याबाबतही हेच होते. तिच्याशी आदिम रूपापासून (मूळ) संलग्न असणाऱ्या पुरुषाच्या शोधात ती व्याकूळ होते. तो तिच्या अपूर्णत्वाला परिपूर्णता देवू शकतो. भारतीय संस्कृतीत अर्धनारीनटेश्वर, शिव-शक्ती, राधा-कृष्ण ही रूपे हेच सूचित करतात. स्त्री-पुरुषांतील ही द्विध्रुवात्मकता आपल्याला हव्या असलेल्या व्यक्तीच्या मीलनासाठी तडफडवते, ओढ लावते. त्यांच्यासाठी प्रेम हा तात्कालिक भावनिक उन्माद असत नाही तर ती एक साधना असते. प्रेमाची नेमकी हीच साधना अनुराधा पाटील यांच्या कवितेत दिसून येते. स्त्री-पुरुषाच्या द्विध्रुवात्मक नात्याचे मिथक त्यांच्या कवितेतून संयुक्तपणे झिरपत राहते. प्रिस्कॉट या विचारवंताच्या मते मानवी अबोध मनात एक वांशिक पातळी असते जी कालातीत असते. स्त्री-पुरुषाच्या या द्विध्रुवात्मक नात्याची मूळे अबोध मनात रुजलेली असतात.

अबोध मनाचा आणि कवितेचा अन्वय सांगताना प्रिस्कॉट हा विचारंवत 'The Poetic Mind' या ग्रंथात नमूद करतो की, ' ' … the deeper thought, in which poetry has its source, is in some sense racial rather than individual. The evidence indicating this is more or less speculative but worth producing because it illustrates the breadth and dept of poetry and supports its universality' प्रिस्कॉट

यांच्या मते, अबोध मनात प्रतिमांच्या, अतृप्त इच्छांच्या भावनांचा प्रचंड साठ असतो. काव्यनिर्मितीत अबोध मनातील या साठ्याचा जेवढा शक्य तेवढा वापर केला जातो. कविता अबोध मनाच्या ज्या सखोल पातळीवरून निर्माण होते त्या पातळीवरील विचारप्रवाह हा वांशिक स्वरूपाचा असतो. या वांशिक पातळीवरील प्रवाह हे स्थलकालातीत असतात म्हणून काव्यात भूत, भविष्य व वर्तमान यांची एकात्मता साधली जाते. या एकत्वामुळे काव्य हे सर्व काळांचे प्रतिनिधित्व करते म्हणूनच मीरेच्या मनात साकार होणारा कृष्ण, जनीच्या मनात आकारलेला विठ्ठल आणि अनुराधा पाटील यांच्या कवितेतला 'तू' हा स्थलकालातील असतो. स्त्रीत्वाच्या वांशिक पातळीवरून त्यांच्या मनाचे तळ सारखेच असल्यामुळे प्रत्यक्ष संवाद न होताही त्या संवादी असतात युगसंवेदनेचे हे नाते प्रिस्कॉटच्या वरील विधानाचा आशयगर्भ अन्वय लावते. अनुराधा पाटील आपल्या कवितेतून मीरा, जनाबाई, विठ्ठल या संस्कृतिसंचितातील मिथकीय कल्पनाबंधाची कलात्मक गुंफण करतात. मीरेने कृष्णाला प्रियकर, पती मानले. जनाबाईने विठ्ठलाशी विविध पातळयांवर नाते प्रस्थापित करून त्याच्याशी संवाद साधला. जनाबाईसाठी विठ्ठल आई, बाप, प्रियकर, मुलगा, ईश्वर सारं काही आहे. अनुराधा पाटील यांच्या कवितेतील 'तो', 'तू' हा कधी ईश्वर, कधी प्रेयकर, कधी पती, कधी दूरस्थ मुलगा तर कधी तू(कवितेला संबोधून) प्रतिभा आहे.

अनुराधा पाटील यांच्या पाचही काव्यसंग्रहाची नावे या मिथकाच्या अनुषंगाने त्याचीमानसिक अंदोलने टिपत राहतात. त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे नाव 'दिगंत' या नावात आकाश (पुरुषतत्त्व) आहे. 'तो' जवळ नसण्याने सर्वव्यापी अथांग एकाकीपणाचा अर्थबोध होतो. '...तरीही' हा दुसरा काव्यसंग्रह त्याच्याशिवाय जगण्याला आलेलं अपूर्णत्व,काहीतरी हातातून निसटून गेल्याची जाणिव '...तरीही' मध्ये आहे. 'दिवसें दिवस' हा त्यांचा तिसरा काव्यसंग्रह पुनरुक्तीझालेल्या कालसूचक शब्दात 'तो' नसला तरी तो भेटण्याचा आशावाद आहे. चौथा काव्यसंग्रह 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' यातून 'त्याच्यावीना', त्याच्यामुळे आलेली जगण्याची क्षणभंगुरता प्रतिबिंबित होते. पाचवा काव्यसंग्रह 'कदाचित अजूनही...' तो येईल! त्याच्याविषयी भाबडा आशावाद उराशी कवटाळून ती शांतपणे त्याची वाट पहातेय... त्याच्या नसण्याचं दुःख संयतपणे सोसत. कोण आहे तो? तिच्यापासून अलग झालेला पुरुषत्त्वचा तो तुकडा ज्यामुळे तिच्या अस्तित्त्वाला पूर्णत्व येवू शकते की तिच्या हाडामासांतून आकारलेला तिचा मुलगा जो तिच्या स्त्रीत्वाच्या वात्सल्यरूपाला पूर्णत्व देतोय. कवयित्रीची ही मानसिक अंदोलने या पुरुषात्वाच्या, आदिपुरुषाच्या मिथकाशी स्वतःला बांधून घेतात त्यांच्याशी ती इतकी एकरूप होतात की, त्याला शोधणं, त्याला समजून घेणं जणू एक आत्मशोध ठरावा.

'माझ्या सगळया आठवणींना वळसा घालून
चालत असतं मनात
सतत पाठमोरं कुणीतरी
ज्यांन रक्तात उमलणाऱ्या शुभ्र फुलांसारखी
ही कविता मला दिलीय
आणि मौनाचा एक समुद्र भोवती पसरून टाकलाय'

(...तरीही पृ.1)

मनात सतत पाठमोरं चालणारा हा आदिपुरुष येथे ईश्वर असू शकतो ज्याने रक्तात उमलणाऱ्यां शुभ्र फुलांसारखी कविता दिलीय अर्थात प्रतिभा दिली आहे. अतिव संवेदनांचे दान दिले आहे तो प्रेयकरही असू शकतो जो मौनाचा समुद्र भोवती पसरून टाकतो त्याचा नेमका चेहरा दिसत नाही. कारण तो सतत पाठमोरं चालतोय.

'मी थांबलेय केव्हांपासून
झळाळत्या आकाशाखाली
पिवळ्या पडत चाललेल्या या गवताळ माळावर
निदान आपली गाणी न्यायला तरी
तो परत फिरेल म्हणून...'

(...तरीही पृ.2)

कवितागत 'ती' थांबलीय 'त्याच्या'साठी. झळाळत्या आकाशाखाली एकाकपणे. एकटेपण सोबत घेवून मावळतीच्या सुर्यकिरणाने गवत पिवळं पडलंय की शिशिराचं अगमन काही असो ती थांबलीय. आशावाद तिने चिवटपणे पकडलाय कारण तो परत येईल ! 'आकाश' हे पुरुषत्त्व, आदिपुरुषाची प्रतिमा. तिच्या 'थांबण्यात' प्रतीक्षा आहे. संयम आहे. सहनशीलता आहे आणि आशावादही!

त्याच्या परत येण्यावर भाबडा विश्वास आहे. 'पिवळं पडत चाललेला गवताळ माळ' प्रतीक्षेचा दीर्घकाल सूचित करतो तसेच आयुष्य सरत चालल्याची जाणिवही सूचित करतो.

'कुणाची निकटता लपेटून असे माझे
कोमेजून गेले आहेत प्राण
की आरंभापासून अंतापर्यंत
हा जीवघेणा प्रवास'

(...तरीही पृ.7)

आदिपुरुष आणि आदिस्त्री शिवशक्तीच्या रूपकात एकच देहात वसलेले आहेत. पुरुषतत्त्व आणि स्त्रीतत्त्व हे एकाच देहाचे अलग झालेले, विखुरलेले दोन तुकडे जे एकत्वासाठी एकमेकांना अविरत शोधत असतात तो तिच्या जन्मासोबत, आरंभाषोबत, स्त्रीत्वासोबत तिचाच म्हणून तिच्यातच साकार झालेला आहे. अंतर्यामी लपटलेली त्याची निकटता अमूर्त आहे तिच्या मूर्त जगण्याचा कोलाहलात त्याची अमूर्तता लपेटून जगण्याचे कवितागत 'ती'चे प्राण कोमेजले आहेत. तो हवा आहे, तो असूनही जवळ नाही तरीही तो माझ्यातच आहे. त्याच्या असण्यानसण्याची आरंभापासूनची जीवघेणी घालमेल तिच्या अंतापर्यंत असणार आहे कवितागत 'ती'ला हा प्रवास जीवघेणा वाटतो. त्यामुळे 'ती'ला वाटते.

'खूप जगून होतं आयुष्य
एखाद्या नावाभोवती
असलेपणाचा तोलच अवघा
विस्कटून सैरभर
आपल्यातूनच पसरलेल्या
घनदाट मुक्या वाटा
कसा प्राणांतिक आकांत
कसे स्वत:शीच वैर ...!'

(...तरीही पृ.10)

मिथक हे अबोधावस्थेतील स्वप्नांचे प्रतिरूपण करते. जगण्याचं भयावह वास्तव असह्य होते तेव्हा मानवी मन आधार शोधत असते. हा आधार जीवलगाच्या रूपात हवा असतो. नेणिवेतला 'तो' जाणिवेच्या स्तरावर कल्पनेत आकारू लागतो. दाहक वास्तवाला नकोशा वाटणाऱ्या जगण्याला मन नाकारु लागते, जगण्याच्या कोलाहलात अस्वस्थ झालेलं मन कल्पनेच्या कुशीत शिरु पाहते. अपेक्षित नसलेलं वास्तव माणूस कल्पिताच्या आधारे जगू पाहतो त्यामुळेच त्याच्या सोसण्याला बळ मिळते आणि जगण्याला उभारी येते. माणूस जगण्याच्या अपूर्णत्वाला कल्पिताने पूर्णत्व देतो म्हणून तर जनीचा विठ्ठल तिला दळण दळू लागतो तिची वेणीफणी करतो. मीरेचा कृष्ण पार्थिवरूपात तिला भेटतो. अनुराधा पाटील यांच्या कवितेतील कवितागत 'ती'ची भावावस्थाही अशीच आहे. स्वत:च्या असलेपणाचा तोल सावरून त्याच्या नसलेल्या अस्तित्त्वाभोवती अख्खं आयुष्य जगायची ही भावविभोर प्रेमसाधना त्याच्याविना इतकं सैरभर करते की स्वत:च्या असलेपणाचा अवघा तोलच विस्कटून जातो. मग उरतो त्याच्या नसण्याचा प्राणांतिक आकांत आणि स्वतःच्या आसण्यांचे स्वत:शीच वैर! मीरेच्या संवेदनेशी आणि व्याकूळत्तेशी एकरूप झालेली अनुराधा पाटील यांची कविता कालातीत ठरते अनुराधा पाटील यांच्या कवितेने मीरेच्या दुःखाचे कूळ शोधले आहे.

कवयित्रीला असलेली आत्मशोधाची जाणिव त्याच्या अस्तित्त्वाजवळच रेंगाळते. कारण तो पुन्हा तिच्या आदिम असण्याचा अर्धा हिस्साच आहे. या अदिम मिथकाचा अन्वय अनेक कवितेतून येतो. म्हणून कवयित्रीचा आत्मशोध म्हणजे पुन्हा त्याचाच शोध!

'तुला समजून घेणं हा तर
मीच माझा सतत घेतलेला शोध होता'

(...तरीही पृ.18)

'ऐकायचा नाही म्हणताना ऐकला मी
तुझ्या रूपानं माझ्या आतला आवाज'

(...तरीही पृ.29)

हा आत्मशोध पुन्हा स्त्री-पुरुष तत्त्वाच्या अदिम मिथकाजवळ येतो. प्रकृती-पुरुष या दोन तुकड्यातून साकार होवू इच्छिणाऱ्या एकात्वाजवळ येतो. कारण स्वत:ला शोधणे म्हणजे त्याला शोधणे आहे; त्याला शोधू तेव्हाच स्वत:च पूर्ण होणं आहे

अनुराधा पाटील यांच्या कवितेत मीरेचे मिथक आहे. युगसंवेदनेच्या प्रतिभासंचिताने मीरेच्या व्याकूळेतेचा वसा आणि वारसा कवयित्रीकडे दिला आहे. मीरेच्या असोशीच्या चषकातले विरहव्याकूळतेच्या विषाचे काही थेंब प्रतिभासंचिताने कवयित्रीच्या ओठाशी लावले. म्हणून तर कळत नकळतपणे मीरेचा मिथकीय आकृतीबंध तिची व्याकूळता त्यांच्या कवितेतून झिरपत राहते मीरेच्या जातीकुळीची ही कविता आहे. राधा, मीरा, अनुराधा... प्रकृतीच्या वंशावळीतून साकार झालेली ही रूपे आहेत अबोध मनातील अतृप्त इच्छा, आकांक्षा ठराविक वंशावळीतून प्रेरित होतात तेव्हा कवितेचा जन्म होतो प्रिस्कॉट यांनी 'The Poetic Mind' या ग्रंथात वंशाचा, अबोध जाणिवेचा व कवितेचा अन्वयार्थ लावला आहे. ते म्हणतात "Poetry must be the product of high desire, to be communicable it must be the product, not of selfish but of shared desire. The greatest poetry is inspired by our highest an most nearly universal desires. It is inspired particularly by the deeper desires arising from the unconscious mind which are significant to the race" उत्कट आसेतून निर्माण झालेली कविता वैयक्तिक असत नाही तर ती वैश्विक असते. अबोध मनातील इच्छा आकांक्षेतून पे्ररित झालेल्या कवितेला वांशिकता असते वांशिकता असलेली अबोध जाणिवेतल्या इच्छा-आकांक्षा असलेली उदात्त कविता वैयक्तिक कधीच नसते, ती वैश्विक असते. प्रिस्कॉटच्या वरील विधानातील महत्त्वाचा शब्द आहे 'म' जात किंवा वंश. उत्कट उदात्त इच्छा-आकांक्षांना जर जात, वंश असेल तर प्रथमत: तो स्त्रीत्वाचा आहे. प्रकृतीचा आहे. आदिम स्त्रीत्वाच्या अर्थातच प्रकृतीच्या वंशावळीतून साकार झालेली कविता म्हणजे मीरेची कविता.. आदिम प्रकृतीला शोध आहे आदिम पुरुषाचा. चैतन्यरूपात एकत्वभाव जगणाऱ्या प्रकृती-पुरुषाचं, स्त्रीतत्त्व-पुरुषत्व जेव्हापासून दोन तुकड्यात विखुरलं गेलं तेव्हापासून एकमेकांना परिपूर्णता देण्यासाठी एकमेकांना अविरतपणे शोधत आहे हा शोध युगायुगांचा आहे याच प्रकृतीच्या वंशावळीतून मीरा आली कधीच न भेटलेल्या कृष्णासाठी ती जन्मभर व्याकूळ राहिली. कारण तो तिच्यात 'एहसास' बनून राहत होता. तिच्या नेणिवेतला-जाणिवेतला कृष्ण तिला पार्थिवरूपात हवा होता. आयुष्याच्या चषकातले कृष्णविरहाचे दु:ख ती एक एक घोट पीत राहिली जन्मभर.

'आपले तर ओठ जळून गेलेत
सुन्या आकाशाची धगधगती निळाई पिताना
आणि संपलेलं त्राण'

(...तरीही पृ.7)

इथे 'आकाश' हे पुरुषतत्त्व सूचित करते मीरेच्या मिथकीय आकृतीबंधाला आविष्कृत करणाऱ्या अनेक काव्यओळी अनुराधा पाटील यांच्या कवितेत दिसून येतात

'चिरकाल कृष्णाला शोधत राहिलेल्या
वृंदावनासारखी रात्र
व्याकूळता पांघरून संपत जाणारी

(...तरीही पृ.21)

'चिरकाल'-आदिमकाळ, त्रेतायुग, द्वापारयुग, कलीयुगात प्रकृती त्याला किती युगांपासून शोधत आहे कधी राधा बनून, कधी मीरा बनून. 'वृंदावनासारखी रात्र' हे दोन शब्द आशयगर्भ आहेत. वृंदावन म्हणजे त्याच्या अस्तित्त्वाच्या खुणा असलेलं ठिकाण जिथल्या चराचरात तो व्यापून आहे. 'रात्र' ही प्रतिमा प्रकृतीची (स्त्री) अदिबंधत्मक प्रतिमा सूचित करते या रात्रीने व्याकूळता पांघरली आहे. कारण ती संपेलच कशी कारण चिरकालाच्या शोधातून आलेल्या या व्याकूळतेला तो या जन्मी, या युगांत भेटले की पुन्हा प्रकृती नव्याने जन्मणार आहे; नव्या रूपात...

'या जन्मात परत कधी भेटच होणार नाही
अशी व्याकूळ करणारी सूक्ष्म थरथर
कापत जाते आरपार'

(...तरीही पृ.25)

मीरेचा मिथकीय कल्पनाबंध साकारणाऱ्या काही ओळी,

'तरी निळंसावळं एक पीस

मनात थरथरत राहतं '

(...तरीही पृ.9)

'गळून पडलेले चालताना रानावनात
कुणाच्या स्वप्नांचे सर
दूर कुठंतरी मनातली मीरा गातेय
ओंजळभर विषाच्या पाण्यावर वाढत आलेली विषवेल
आपल्यातही मुळं रुजवून पुढं जातेय'

(...तरीही पृ.39)

'त्याला' शोधताना 'तिच्या' स्वप्नांचे सर रानावनात कधीचेच गळून पडलेत. दाहक वास्तवात त्याचं अपार्थिव असणं, त्याचा अहसास कुठेच पार्थिवात सापडत नाही. विरहाच्या विषवेलीला व्याकूळतेची फुलं येणारच! ही व्याकूळतेची फुलं केसांत माळून हातात करताल, एकतारी घेवून ती पदावली (कविता) गुणगुणत त्याला शोधतेय राजमहालात त्याच्याच विचाराचा मग्नतेत पदन्यास करणारी तिची शुभ्रगौर पावले हमरस्त्यावर आली आणि आता तर रानोमाळ! राजमहलात त्याच्या तद्रुपतेत नाचताना गळयांतले मोत्यांचे सर कधीच गळून गेले. उरले होते स्वप्नांचे सर ... आता स्वप्नांचे सरही गळून गेले आता गळयात ना मोत्याची सर ना स्वप्नांचे सर.. आहे फक्त त्याच्यासाठीची 'जळती तहान' आता आयुष्यच वीणा झालंय दु:खाची अनंत बोटं फिरत राहतात-प्रत्येक काळात!

'तिलाच फक्त कळाले
मीरा असणं म्हणजे
मुळातच कुणासाठी तरी
काही होण्याची जळती तहान
दु:खाची अनंत बोटं
फिरत राहतात मग
आयुष्याच्या वीणेवर
प्रत्येक काळात'

(...तरीही पृ.40)

प्रस्तुत कवितेतील 'प्रत्येक काळात' हा शब्द असीम अर्थ अधोरेखित करतो. प्रकृती-पुरुषाच्या आदिम मिथकाची आणि प्रिस्कॉटच्या 'Racial Element' च्या मांडणीजवळ येतो. कारण प्रत्येक काळात हेच होत आहे. कवयित्री प्रकृतीरूपात आणि प्रकृती कवयित्रीच्या रूपात त्याला शोधत आहे. ती मीरा होती; आता कवितागत 'ती' प्रत्येक काळात तिच्या आयुष्याच्या वीणेवर दुःखाची अनंत बोटे फिरत आहेत. आता मात्र कवितागत 'ती'ला तिच्या कहाणीचा सुफळ शेवट हवा आहे.

## निष्कर्ष:

- मिथकांना सर्व धर्माचे आणि अखिल मानवी संस्कृतीचे अंग असते मिथकांची निर्मिती सार्वत्रिक व सर्वकालीन असून ती मानवी मनाची एक गरज असल्याचे दिसून येते.
- मिथककथेचा कल्पनाबंध कायम असला तरी कालोघात त्या कथेत वारंवार परिवर्तन होत असल्याचे आढळून येते.
- अनुराधा पाटील या युगसंवेदनेशी नाते जोडणारी कवयित्री आहेत त्या मीरा, जनाबाई, विठ्ठल या संस्कृतीसंचितातील मिथकीय, कल्पनाबंधाची कलात्मक गुंफण करीत कवितेला कालातीत बनवतात.
- त्यांच्या कवितेतील 'तो'(तू) हे मिथकच आहे. या मिथकांतून नेणिवेतल्या अदिम पुरुषाचे एक समग्र रूप अनुराधा पाटील आपल्या कवितेतून शब्दबध्द करतात.
- अनुराधा पाटील यांच्या कवितेत सामूहिकअचेतनेच्या स्तरावरून आदिपुरुष प्रतिमा साकार होतात.
- स्त्री-पुरुषाच्या द्विध्रुवात्मक नात्याचे मिथक अनुराधा पाटील यांच्या कवितेतून संयुक्तपणे झिरपत राहते.

**संदर्भ:**

१. ‘दिगंत’, अनुराधा पाटील, (1981),
२. ‘तरीही’, अनुराधा पाटील, (1985),
३. ‘दिवसेंदिवस’, अनुराधा पाटील, (1992),
४. ‘वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ’, अनुराधा पाटील, (2005)